बृहन्मुंबई महानगरपालिका
लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय
लक्ष्मीबाई केळकर मार्ग, शीव, मुंबई ४०००२२
ई-मेल: deanltmg@rediffmail.com & hc.edu@ltmmc.edu.in
दुरध्वनी क्रमांक: 022-24063042/43/44 संकेतस्थळ: www.ltmgh.com

क्र.LTH/११६८/Ed दिनांक २३.१०.२०२४

## अधिसूचना [शैक्षणिक वर्ष २०२४-२५]

## विज्ञान स्नातक (सह वैद्यकीय तंत्रज्ञान) [B.Sc in Paramedical Technology] अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी

मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, महाराष्ट्र शासन यांच्या क्र.DMER/११०११/३१/२०२२-CETIT दिनांक १४.१०.२०२४ अन्वयेच्या सुचना पत्राच्या अनुषंगाने, सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई येथील खालील पदवी (UG) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ (Annexure-A) नुसार विहित नमुन्यात ऑफलाईन (OFFLINE) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्त्यात नमुद केलेल्या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास क्र.मआविवि/ई-१/युजी/३९/१०११०४/५३७/२०२४ दिनांक ११.०९.२०२४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश (ADMISSION) देण्यात येतील.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १) | B.Sc. (Paramedical Technology – Radiography) | ०८ |
| २) | B.Sc. (Paramedical Technology – Operation Theater) | ०८ |
| ३) | B.Sc. (Paramedical Technology – Perfusion Technician) | ०२ |
| ४) | B.Sc. (Paramedical Technology – Cardiology) | ०२ |
| | *** एकूण *** | २० |

अभ्यासक्रमाचा कालावधी- तीन (३) वर्ष अभ्यासक्रम अधिक एक (१) वर्ष आंतरवासीता

१) B.Sc. (Paramedical Technology – Radiography) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षण तक्ता.

सामाजिक व समांतर आरक्षणाचा तक्ता

| | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | १ | १ | - | १ | ५ |
| महिला आरक्षण | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| दिव्यांग आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

Scanned with CamScanner

२) B.Sc. (Paramedical Technology – Operation Theater) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षण तक्ता.

| सामाजिक व समांतर आरक्षणाचा तक्ता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | खुला | एकूण |
| सर्वसाधारण | १ | - | १ | - | - | - | - | - | १ | २ | ५ |
| महिला आरक्षण | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| दिव्यांग आरक्षण | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | १ |

३) B.Sc. (Paramedical Technology– Perfusion Technician) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षण तक्ता.

| सामाजिक व समांतर आरक्षणाचा तक्ता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | खुला | एकूण |
| सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| महिला आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| दिव्यांग आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

४) B.Sc. (Paramedical Technology – Cardiology) या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षण तक्ता.

| सामाजिक व समांतर आरक्षणाचा तक्ता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | खुला | एकूण |
| सर्वसाधारण | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | १ |
| महिला आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | १ |
| दिव्यांग आरक्षण | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

<u>टिप</u> -

१) आरक्षित प्रवेशाच्या जागांसाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे खालील गटात नमुद केल्याप्रमाणे सदर जागा आंतरपरिवर्तनाने उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करुन गुणवत्तेच्या आधारावर भरण्यात येतील.

| गट-अ | | गट-ब | | गट-क | |
|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३% | विमुक्त जाती (अ) | ३% | भटक्या जमाती (क) | ३.५% |
| अनुसचित जमाती | ७% | भटक्या जमाती (ब) | २.५% | भटक्या जमाती (ड) | २% |
| | | | | इतर मागासवर्ग (विमाप्र प्रवर्गासह) | १९% |

Scanned with CamScanner

२) महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.३० दिनांक ०१ ऑगस्ट २००६ मधील निर्देशानुसार, विशेष मागास प्रवर्गातील (SBC) उमेदवारांना त्यांच्या संबंधित मूळ प्रवर्गातून जसे की इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातून प्रवेशाकरिता विचारात घेण्यात येईल.

३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) प्रवर्गातील रिक्त राहणा-या प्रवेशाच्या जागा ह्या खुल्या (OPEN) प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

## सामाजिक व समांतर आरक्षण

१) सामाजिक व अन्य समांतर आरक्षणाच्या जागांवरील प्रवेशासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे / धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२) महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांवरील प्रवेश शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर प्रवेशाच्या जागा त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

३) शारीरिकदृष्ट्या अपंग (PWD) उमेदवारांकडे अर्ज सादर करतेवेळी सक्षम प्राधिका-यांनी निर्गमित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. इतर कोणतेही प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या कोट्यासोबत संवैधानिक आरक्षण (CONSTITUTIONAL RESERVATION) असल्यास अशा विद्यार्थ्यांकडे शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याचे प्रमाणपत्र, त्याचप्रमाणे संवैधानिक आरक्षणासाठी लागू असलेली योग्य ती प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) आरक्षण - महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एनईडी-१०१९/प्र.क्र.३७/१९/शिक्षण-२ दिनांक ०७.०३.२०१९ मधील निर्देशानुसार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) प्रवेशाच्या जागा भरण्यात येतील.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) उमेदवारांकरिता वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२.०२.२०१९ दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेली कागदपत्रे अर्ज सादर करतेवेळी व त्याबाबतीच मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

५) सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग (SEBC) आरक्षण - दिनांक २६.०२.२०२४ रोजीचा महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्रमांक १६) मधील तरतुदीनुसार, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाची (SEBC) प्रवेशाच्या जागा भरण्यात येतील.

तसेच, वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५ दिनांक २८.०६.२०२४ अन्वये विहीत करण्यात आलेली कागदपत्रे अर्ज सादर करतेवेळी व त्याबाबतची मुळ कागदपत्रे प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २२.०७.२०२४ नुसार सन २०२४-२५ मधील वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. प्रवेशाचे वेळी सदर उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) प्रवर्गासाठी प्रवेशित जागांवरील आरक्षण हे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.३४६८/२०२४ मधील आणि इतर भविष्यातील न्यायालयीन याचिकांमधील निर्णयांसापेक्ष राहील.

## शैक्षणिक अर्हता / पात्रता -

उमेदवाराने विज्ञान स्नातक (सह वैद्यकीय तंत्रज्ञान) [B.Sc in Paramedical Technology] प्रवेशासाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता / पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | १) | उमेदवाराकडे भारताचे नागरिकत्व असणे आवश्यक आहे. |
| | २) | उमेदवाराचा जन्म दिनांक ३१ डिसेंबर २००७ पुर्वी झालेला असावा. |
| | ३) | उमेदवाराने १० वी आणि १२ वी इयत्ता महाराष्ट्र राज्यातील संस्थामधून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| | ४) | उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे. |
| | ५) | उमेदवाराने इयत्ता १२ वी (विज्ञान शाखा) ही भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रज्ञ व जीवशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झालेला असावा. |
| | ६) | उमेदवार १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेले असल्यास उदा.Medical Lab Technician-१, Medical Lab Technician-२, Medical Lab Technician-३ हे विषय घेवून उत्तीर्ण झाला असल्यास त्याला त्याच्या विषयासंबंधी बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमास पात्र ठरविण्यात येईल. |
| | ७) | उमेदवार १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी इतर विषयात विज्ञान शाखा उत्तीर्ण झालेले असल्यास उदा.Radiology Technician-१, Radiology Technician-२, Radiology Technician-३ हे विषय घेवून उत्तीर्ण झाला असल्यास त्याला त्याच्या विषयासंबंधी बी.एस्सी. इन पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी-रेडिओग्राफी टेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमास पात्र ठरविण्यात येईल. |

## प्रवेशाचे निकष व कार्यपद्धती -

१) विज्ञान स्नातक (सह वैद्यकीय तंत्रज्ञान) [B.Sc in Paramedical Technology] अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांनी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. उमेदवारांनी महाविद्यालयाच्या www.ltmgh.com संकेतस्थळावर LTM Medical College या टॅबवर क्लिक करुन MBBS & Allied Courses Admission यामध्ये दिलेल्या प्रवेशाच्या अर्जाची प्रत डाऊनलोड करावी व त्याप्रमाणे विहित मुदतीत अर्ज सादर करावा. (या महाविद्यालयाकडे कोणीही प्रत्यक्ष येऊन अर्जाची मागणी करु नये.)

२) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, इतर कोणत्याही प्रकारे प्राप्त झालेले अथवा यापूर्वी या महाविद्यालयाकडे प्राप्त झालेले अर्ज सदर प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

Scanned with CamScanner

३) विहित मुदतीत या महाविद्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची सर्वप्रथम या अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी, शर्तीप्रमाणे छाननी करण्यात येईल व त्याप्रमाणे उमेदवारांनी १२ वी विज्ञान परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांनी प्रवेश अर्जामध्ये नमुद केलेल्या विषयासाठी दिलेल्या पसंतीक्रमानुसार (CHOICE PREFERENCE) गुणवत्तेनुसार सामाईक गुणवत्ता यादी (Common Merit List) व तात्पुरती निवड यादी (Provisional Merit List) तयार करण्यात येईल व सदर याद्या वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी महाविद्यालयाच्या विद्यार्थी विभागाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येतील.

टीप - ज्या उमेदवारांनी इयत्ता १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी Medical Lab Technician-१, Medical Lab Technician-२, Medical Lab Technician-३ हे विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल अशा उमेदवारांना बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी) अभ्यासक्रमाकरिता त्याच्या विषयासंबंधी पात्र ठरविण्यात येईल.

टीप - ज्या उमेदवारांनी १२ वी विज्ञान परीक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांऐवजी Radiology Technician-१, Radiology Technician-२, Radiology Technician-३ हे विषय घेवून उत्तीर्ण केलेली असेल अशा उमेदवारांना बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी (बीपीएमटी-रेडिओग्राफी टेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमास पात्र ठरविण्यात येईल.

४) बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमासाठी उमेदवारांनी प्रवेश अर्जामध्ये दिलेल्या विषयाच्या पसंतीक्रमानुसार (CHOICE PREFERENCE) सामाईक गुणवत्ता यादीतील (Common Merit List) दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान असल्यास, खालील निकष लागू राहतील.

अ) इ.१२ वी परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा Medical Lab Technician-१, Medical Lab Technician-२, Medical Lab Technician-३ किंवा Radiology Technician-१, Radiology Technician-२, Radiology Technician-३ व इंग्रजी विषयाचे गुण विचारात घेण्यात येतील.

ब) उपरोक्त (अ) प्रमाणे गुण समान असल्यास, इ.१२ वी विज्ञान परीक्षेत प्राप्त केलेल्या एकूण गुणांची टक्केवारी विचारात घेण्यात येईल.

क) उपरोक्त (अ) व (ब) प्रमाणे गुण समान असल्यास, उमेदवाराच्या वयानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल. (वयाने जेष्ठ उमेदवाराचा क्रम वरती असेल)

ड) उपरोक्त (अ), (ब) व (क) प्रमाणे निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, अशा उमेदवाराचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार (पहिले आद्याक्षर 'अ' ने सुरु होऊन शेवटचे 'ज्ञ' या क्रमाने) अनिश्चित करण्यात येईल.

५) गुणवत्तेनुसार तयार केलेल्या सामाईक गुणवत्ता यादीबाबत व तात्पुरत्या निवड यादीबाबत ज्या उमेदवारांचे आक्षेप असतील तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी या महाविद्यालयाकडे सादर करावेत. अशा प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन अंतिम सामाईक गुणवत्ता यादी व तात्पुरती निवड यादी (शैक्षणिक व इतर आवश्यक मुळ प्रमाणपत्राच्या पडताळणीसापेक्ष) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी महाविद्यालयाच्या विद्यार्थी विभागाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

६) प्रवेश फेरी-१ व प्रवेश फेरी-२ करिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना मुळ कागदपत्रांच्या पडताळणीकरिता बोलाविण्यात येईल. सदरहू दिवशी उमेदवारांनी यापूर्वी सादर केलेला प्रवेश अर्ज व त्यासोबतच्या साक्षांकीत छायाप्रतीचे एकूण ३ बंच सोबत जाणावेत. त्याचप्रमाणे परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे

Scanned with CamScanner

शैक्षणिक व इतर शुल्कांचा धनादेश सोबत आणावा. तसेच सोबत १ पेनड्राईव्ह आणावा त्यामध्ये सर्व मुळ कागदपत्रांच्या (.PDF) व (.JPEG) फोल्डर तयार करुन सर्व मुळ कागदपत्रांच्या सॉफ्ट कॉपी (६०० केबी पर्यंत) असाव्यात. मुळ कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचा प्रवेश निश्चित करण्यात येईल. तसेच, ज्या उमेदवारांकडे प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध नसतील, अशा उमेदवारांना प्रवेश फेरीतून अपात्र ठरविण्यात येईल.

७) प्रवेश फेरी-१ व प्रवेश फेरी-२ मध्ये रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवेश फेरी-३ (मॉप अप-१) घेण्यात येईल. अशा प्रवेश फेरीसाठी उर्वरित उमेदवारांनी वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी सकाळी १०.३० ते ११.३० पर्यंत विद्यार्थी विभाग येथे उपस्थित रहावे. सकाळी ११.३० नंतर उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. सदरहू दिवशी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणानुसार प्रवेशाच्या रिक्त जागांकरिता कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल व त्याप्रमाणे प्रवेश निश्चित करण्यात येईल. सदर दिवशी प्रवेश निश्चित होणा-या उमेदवारांना त्याच दिवशी परिशिष्ट-ब प्रमाणे शैक्षणिक व इतर शुल्काचा धनादेश भरणे बंधनकारक आहे.

८) प्रवेश फेरी-१, प्रवेश फेरी-२ व प्रवेश फेरी-३ (मॉप अप) मध्ये रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवेश फेरी-४ (मॉप अप-२) घेण्यात येईल. अशा प्रवेश फेरीतील उमेदवारांनी वेळापत्रकात नमूद केलेल्या दिवशी सकाळी १०.३० ते ११.३० पर्यंत विद्यार्थी विभाग येथे उपस्थित रहावे. सकाळी ११.३० नंतर उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. सदरहू दिवशी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षणानुसार प्रवेशाच्या रिक्त जागांकरिता कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल व त्याप्रमाणे प्रवेश निश्चित करण्यात येईल. सदर दिवशी प्रवेश निश्चित होणा-या उमेदवारांना त्याच दिवशी परिशिष्ट-ब प्रमाणे शैक्षणिक व इतर शुल्काचा धनादेश सादर करणे बंधनकारक आहे.

९) सर्व प्रवेश प्रक्रिया अंतिम दिनांकापूर्वी (२९ नोव्हेंबर २०२४ पूर्वी) पार पाडण्यात येईल.

१०) सदर अभ्यासक्रमातील निवड ही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या मानकानुसार राहील.

१२) एखाद्या उमेदवारांने एकापेक्षा अधिक विषयांसाठी पसंतीक्रम (CHOICE PREFERENCE) दिलेला असेल व त्याप्रमाणे सदर उमेदवाराची एकापेक्षा अधिक विषयासाठी निवड होत असेल तर, अशा उमेदवारास केवळ एकाच विषयासाठी प्रवेश घेता येईल.

<u>प्रवेशासाठी अर्ज करण्याचे ठिकाण</u> -

१) बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाचे प्रवेश अर्ज (परिशिष्ट-अ प्रमाणे) विद्यार्थी / पालक ह्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आवक-जावक विभाग, लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई या ठिकाणी सादर करावेत. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर आवक जावक विभागाकडून अर्जाची पोहोच घेण्यात यावी.

२) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत. यापूर्वी या महाविद्यालयात व अन्य ठिकाणी, अन्य प्रकारे सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. या महाविद्यालयाने कोणत्याही व्यक्तिला किंवा इतर दुस-या संस्थेला प्रवेश अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची नोंद घ्यावी.

Scanned with CamScanner

<u>प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक</u> -

प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्व माहिती या महाविद्यालयाच्या www.ltmgh.com संकेतस्थळावर तसेच विद्यार्थी विभागाच्या सुचना फलकावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

| विवरण | वेळापत्रक |
|---|---|
| विद्यार्थी / पालक यांनी व्यक्तिशः उपस्थित राहून आवक-जावक विभाग येथे प्रवेशासाठीचा अर्ज सादर करण्याचा कालावधी (सुट्टीचे दिवस वगळून) | २४.१०.२०२४ ते ३१.१०.२०२४ पर्यंत (स.१०.३० ते दु. ०५.०० पर्यंत) |
| अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची प्रसंतीक्रमानुसार गुणवत्तेनुसार सामाईक गुणवत्ता यादी व तात्पुरती निवड यादी प्रकाशित करण्याचा दिनांक | दिनांक ०६.११.२०२४ रोजी |
| सामाईक गुणवत्ता यादी व तात्पुरत्या निवड यादीवरील आक्षेप स्वीकारण्याचा दिनांक | दिनांक ०७.११.२०२४ रोजी |
| सामाईक गुणवत्ता यादी व तात्पुरत्या निवड यादीवरील आक्षेपाचे निराकरण केल्यानंतर पसंतीक्रमानुसार सामाईक गुणवत्ता यादी (अंतिम) व तात्पुरती निवड यादी (अंतिम) प्रकाशित करण्याचा दिनांक | दिनांक ०८.११.२०२४ रोजी |
| प्रवेश फेरी-१ | |
| तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश घेण्याची अंतिम तारीख (मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक शुल्क धनादेशासह) | दिनांक ११.११.२०२४ ते १४.१०.२०२४ पर्यंत सायं. ०५.०० पर्यंत |
| प्रवेश फेरी-२ | |
| उर्वरीत रिक्त जागा प्रकाशित करण्याचा दिनांक तसेच रिक्त जागाकरिता प्रसंतीक्रमानुसार तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | दिनांक १९.१०.२०२४ रोजी |
| प्रसंतीक्रमानुसार तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांना प्रवेश घेण्याची अंतिम तारीख (मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक शुल्क धनादेशासह) | २०.११.२०२४ ते २२.११.२०२४ |
| प्रवेश (MOP UP-१) फेरी-३ | |
| प्रवेश फेरी-१ व २ नुसार रिक्त राहणा-या जागांकरिता उर्वरित उमेदवारांनी प्रवेशासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा दिनांक (मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक शुल्क धनादेशासह) | दिनांक २६.१०.२०२४ रोजी |
| प्रवेश (MOP UP-२) फेरी-४ | |
| प्रवेश फेरी-१, २ व ३ नुसार, रिक्त राहणा-या जागांकरिता उर्वरित उमेदवारांनी प्रवेशासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा दिनांक (मुळ प्रमाणपत्रे व आवश्यक शुल्क धनादेशासह) | दिनांक २८.१०.२०२४ रोजी |
| प्रवेश प्रक्रिया समाप्तीची अंतिम तारीख (CUT-OFF DATE) | दिनांक २९.१०.२०२४ रोजी |

टीप - काही अपरिहार्य कारणास्तव प्रवेश प्रक्रियेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास, त्याबाबतची सुचना या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विभागाच्या सुचना फलकावर देण्यात येईल.

Scanned with CamScanner

शैक्षणिक व इतर शुल्क तक्ता (निवड झालेल्या उमेदवारांकरिता-प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी)

१) शासन निर्णय क्र.एएमसी-१००७/६२८/सीआर१४८/७/शिक्षण-२ दिनांक ०१.०३.२०११ व संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या क्र.DMER/११०११/९/२०२२-CETIT दिनांक ०६.०६.२०२३, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये, बी.एस्सी. इन पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी शैक्षणिक व इतर शुल्काचा तक्ता परिशिष्ट-ब प्रमाणे राहील.

२) निवड यादीमध्ये नाव अंतर्भूत असलेल्या ज्या उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी बोलाविण्यात येईल, त्यावेळी उमेदवारांनी परिशिष्ट-ब प्रमाणे "BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION" च्या नावे धनादेश / पे ऑर्डर सोबत आणावा.

३) शिष्यवृत्ती / फ्रीशिप योजना इत्यादींचा विहित लाभ मिळवण्यासाठी अंतिम प्रवेश मिळालेल्या उमेदवाराने योजनेची पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे आणि महाविद्यालय / संस्थेत अंतिम प्रवेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत MAHADBT पोर्टलद्वारे ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण सुचना -

१) प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्व अधिकार अधिष्ठाता, लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

२) विहित आरक्षणानुसार जागांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रवेश देण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता, अटी / शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल. प्रवेश मिळाला असला तरी तरी सदर प्रवेश रद्द करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा प्रवेशाच्या आरक्षित जागांवर विचार केला जाणार नाही.

४) उमेदवाराने अर्जासोबत खालील नमुद केलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या मुळ प्रती तसेच त्यांच्या साक्षांकीत प्रती तपासणीसाठी प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

अ) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

ब) उमेदवाराने अधिसूचनेमध्ये नमुद केलेली विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्रे तसेच मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती अर्जासमवेत सादर करणे आवश्यक आहेत. तसेच निवड झालेल्या उमेदवारांनी प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सदर प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे.

क) उमेदवारांच्या नावात बदल झाल्याबाबत राजपत्र किंवा नोटरी केलेले शपथपत्र सादर करावे.

ड) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक ३१.०५.२०२१ मधील निर्देशांनुसार सक्षम प्राधिका-यांकडून

Scanned with CamScanner

प्राप्त झालेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राची वैधता अर्ज सादर केल्याच्या कालावधीपासून प्रवेश प्रक्रिया चालू असतानाच्या कालावधीतील असावी.

ई) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५ दिनांक २८.०६.२०२४ मधील निर्देशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

फ) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) प्रवर्गातंर्गत आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या उमेदवाराने २६.०६.२०१३ रोजीच्या शासन निर्णय क्र.सीबीसी१०/२००८/सीआर-६९७ व्हीजेएनटी-१ मध्ये नमूद केल्यानुसार नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र ३१.०३.२०२५ पर्यंत वैध असावे.

५) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड / पॅन कार्ड / मतदार ओळखपत्र

६) पात्र ठरलेल्या उमेदवारांची एकत्रित सामायिक गुणवत्ता यादी तयार करुन, सदर गुणवत्ता यादीमधील उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुला प्रवर्गाच्या पदाकरिता विचार करण्यात येईल.

७) तात्पुरती निवड यादी उमेदवाराच्या मुळ शैक्षणिक व इतर अनुषंगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे पडताळणीवेळी सादर न केल्यास त्याचे नाव निवड यादीतून रद्द करण्यात येईल.

८) निवड यादी जाहीर करण्यात आल्यानंतर निवड यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या उमेदवारांचा निवड यादी संबंधी कोणताही अर्ज किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) उमेदवार मुळ कागदपत्रे पडताळणी करुन तो/ती विहित अटी व शर्तीनुसार यथायोग्य असल्यास प्रवेश देण्यात येईल. तथापि, प्रवेशाच्या कार्यवाही दरम्यान उमेदवार प्रवेशासाठीच्या विहित अर्हता पूर्ण करीत नाही असे प्रवेशाच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा प्रवेशानंतर लक्षात आल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

१०) उमेदवाराचा प्रवेश गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, जागांची उपलब्धता, निवडयादीची विधीग्राह्यता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येईल.

११) प्रवेशित क्षमते इतकीच कागदपत्रे पडताळणीसापेक्ष निवड यादी तयार करुन प्रसिद्ध करण्यात येईल.

१२) ज्या उमेदवाराचा प्रवेश निश्चित झालेला असेल अशा उमेदवारास कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारता येणार नाही.

१३) निवड झालेल्या उमेदवारास परिशिष्ट-ब प्रमाणे शैक्षणिक शुल्क, प्रवेश शुल्क, अनामत रक्कम, विद्यापीठाच्या नोंदणी व पात्रतेचे शुल्क भरावे लागतील.

१४) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक ०५.०९.२०२४ नुसार सन २०२४-२५ मधील वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठी इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातून प्रवेशासाठी निवड झालेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या पावतीच्या आधारे प्रवेशाची कार्यवाही करण्यात येईल. शासन निर्णयानुसार संबंधित जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवारांने सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार स्वतः जबाबदार राहतील, याची संबंधित उमेदवार, पालक यांनी नोंद घ्यावी. सदर सुविधा ही फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातून प्रवेशासाठी निवड झालेल्या उमेदवारांकरिता आहे.

१५) अंतिम प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना प्रवेशानंतर महाविद्यालयाचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी महाविद्यालय प्रशासनाची राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

Scanned with CamScanner

१६) अराखीव (खुला) जागांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी जागा आरक्षित / उपलब्ध नसली तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१७) महाविद्यालयांमध्ये होणा-या रॅगिंग सदृश्य प्रकारांवर आळा घालण्याकरिता शासनाकडून देण्यात येणा-या निर्देशानुसार रॅगिंग प्रतिबंध करावयाच्या दृष्टीने अंतिम प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी ॲंटी रॅगिंग बाबतचे शपथपत्र महाविद्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

## विशेष सुचना -

१) सदर अधिसुचनेमध्ये अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता / पात्रता, सामाजिक / समांतर आरक्षणाची माहिती, अभ्यासक्रमाचा कालावधी, वयोमर्यादा, प्रवेशाकरिता अर्जाचा नमुना, अभ्यासक्रमांचा प्रसंतीक्रम, प्रवेशासाठीचे निकष, गुणवत्ता यादी तयार करण्याची पद्धती, वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना व इतर अटी व शर्ती याबाबतची माहिती दिलेली आहे. सदर अधिसुचना महाविद्यालयाच्या www.ltmgh.com संकेतस्थळावर व विद्यार्थी विभागाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

२) प्रवेश प्रक्रिया अत्यंक तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

३) सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नसून संबंधित उमेदवारांनी विद्यार्थी विभागाचे सुचना फलक वेळोवेळी पाहणे आवश्यक आहे. उमेदवाराने सदर अधिसूचनेत नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रवेशासाठीचा अर्ज सादर करावा.

४) एखाद्या उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला प्रवेश प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

५) मध्यस्थ / ठक / महाविद्यालयामध्ये संबंधित असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने प्रवेश मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याची सुचना उमेदवारांना देण्यात येत आहे.

सही/- (२३.१०.२०२४)
(डॉ. प्रमोद इंगळे)
अधिष्ठाता (शैक्षणिक)
लो.टि.स.रु. व वै.म., शीव

सही/- (२३.१०.२०२४)
(डॉ. मोहन जोशी)
अधिष्ठाता
लो.टि.स.रु. व वै.म., शीव

Scanned with CamScanner

परिशिष्ट-अ

BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION
LOKMANYA TILAK MUNICIPAL MEDICAL COLLEGE & GENERAL HOSPITAL
Laxmibai Kelkar Marg, Sion, Mumbai 400 022.
Email: deanltmg@rediffmail.com & hc.edu@ltmmc.edu.in
Phone: 022-24063042/43/44 Website: www.ltmgh.com

| | |
|---|---|
| **Application No.:-** | |
| **Application Date :-** | |

**APPLICATION FOR B.SC. (PARAMEDICAL TECHNOLOGY)**
**[CARDIOLGY, PERFUSION, RADIOGRAPHY, OPERATION THEATER]**

*Applicant passport size photograph*

**To,**
**Hon'ble Dean,**
**LTMMC, Sion, Mumbai.**

I, the undersigned is submitting my willingness / application for B.Sc. (Paramedical Technology) course at Lokmanya Tilak Municipal Medical College, Sion, Mumbai.

My Details are as below: (Please put tick (✓) mark)

| **PERSONAL INFORMATION** | | | |
|---|---|---|---|
| Name of the Candidates (In English) (As per 12th Mark sheet) | | | |
| Name of the Candidates (In Marathi) | | | |
| Whether your name is changed or updated after 10th or equivalent qualification? | Yes ☐ No ☐ | | |
| Wheather the Candidate is resident of Maharashtra for fifteen (15) years ? | Yes ☐ No ☐ | | |
| Name of the Father : ____________ | | | |
| Occupation : ____________ Annual Income : ____________ | | | |
| Name of Mother : ____________ | | | |
| Occupation : ____________ Annual Income : ____________ | | | |
| Guardian's Name (if Father is not a Guardian) : ____________ | | | |
| Relationship with Guardian: ____________ Annual Income : ____________ | | | |
| Gender : Male ☐ Female ☐ | | Date of Birth : / / | |
| Place of Birth : | Village/ Town: ____________ Taluka ____________ District ____________ State ____________ | | |
| Mobile No. (Self): | | Mobile No. (Parent):: | |
| Religion : | | Nationality : | |
| Aadhar No. : | | Mother Tongue: | |
| Email ID : | | | |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| Permanent Address : (Applicant) | Address: ____________________<br>____________________<br>City : ____________ State :____________<br>District : ____________ Taluka : ____________<br>Pin Code : ____________ |
| Local Address : (Applicant) | Address: ____________________<br>____________________<br>City : ____________ State :____________<br>District : ____________ Taluka : ____________<br>Pin Code : ____________ |

**RESERVATION (SC, ST, VJA, NTB, NTC, NTD, OBC/SBC, EWS, SEBC, OPEN)**

Category of Candidate : ____________ Caste :__________ Sub Caste : __________

| | | |
|---|---|---|
| Are you a Person With Disabiligy (PWD)? | Yes ☐ | No ☐ |
| Is the candidate an Orphan? | Yes ☐ | No ☐ |

Category under which I am submitting my application (Please put tick (✓) mark.

| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | OBC (SBC) | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

**EDUCATION QUALIFICATION**

| Name of Examination | Month & Year of Passing | No.of Attempt | Total Marks | | Percentage | Name of the Board |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Obtained | Out of | | |
| S.S.C. ($10^{th}$) or Equivalent | | | | | | |
| H.S.C. ($10^{th}$) or Equivalent | | | | | | |

S.S.C. ($10^{th}$) or Equivalent School Name & Address: ____________________

____________________________________________

H.S.C. ($12^{th}$) or Equivalent School / College Name & Address : ____________________

____________________________________________

**HSC QUALIFICATION**

| SUBJECT | MARKS OBTAINED | MARKS OUT OF |
|---|---|---|
| PHYSICS | | |
| CHEMISTRY | | |
| BIOLOGY | | |
| ENGLIGH | | |
| **PCB TOTAL** | | |
| **PCBE TOTAL** | | |
| **PCB PERCENTAGE** | | |
| **PCBE PERCENTAGE** | | |

Scanned with CamScanner

| COURSE CHOICE (PREFERENCES)<br>(Courses : Cardiology, Perfusion, Radiography, Operation Theater) | |
|---|---|
| First (1st) Choice | |
| Second (2nd) Choice | |
| Third (3rd) Choice | |
| Forth (4th) Choice | |

Place :

Date : / /

Signature of the Parent / Guardian

Signature of the Candidate

**List of following certified xerox copies of certificates attached.**

| Sr. No. | Name of Certificates | Yes / No |
|---|---|---|
| 1 | Nationality certificates issued by District Magistrate / Addl. District Magistrate or Metropolitan Magistrate (Competent Authority for issue of such certificate) / Valid Indian Passport / School Leaving Certificate of HSC / 12th std. Indicating the nationality of the candidate as 'Indian' | Yes / No |
| 2 | Domicile Certificate issued by District Magistrate / Metropolitan Magistrate or Competent Authority for issue of such certificate. | Yes / No |
| 3 | 10th S.S.C. Passing Certificate | Yes / No |
| 4 | 12th H.S.C. Marksheet | Yes / No |
| 5 | Physical Fitness Certificate (Annexure – C)<br>(प्रत्यक्ष कागदपत्रांच्या पडताळणीवेळी सादर करण्यात यावे) | Yes / No |
| 6 | Caste Certificate (if applicable) | Yes / No |
| 7 | Caste Validity Certificate (if applicable) | Yes / No |
| 8 | Creamy Layer or Non Creamy Layer Certificate (For VJ, NT1, NT2, NT3 & OBC including SBC – Valid upto 31.03.2025) NOT REQUIRED for SC & ST category. | Yes / No |
| 9 | Eligibility Certificate for EWS category issued by appropriate authority, for the year 2024-25 (As per State Govt. Format) | Yes / No |
| 10 | College Leaving Certificate (L.C.) / Transfer Certificate (T.C.) | Yes / No |
| 11 | Educational Gap Certificate (if applicable) (Affidavit by student) | Yes / No |
| 12 | For Person with disability (PWD) Candidates - Medical Fitness Certificate of Authorized Medical Board. (if Applicable) | Yes / No |
| 13 | For Orphan - respective certificate from Women and Child welfare department (if Applicable) | Yes / No |
| 14 | Aadhar Card | Yes / No |

Scanned with CamScanner

**Acknowledgement Receipt**

Received application from ________________________________________ for B.Sc. (Paramedical Technology) admission course at Lokmanya Tilak Municipal Medical College, Sion, Mumbai 400 022 for the Academic Year 2024-2025.

Date :

Office Stamp

Scanned with CamScanner

परिशिष्ट-ब

BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION
LOKMANYA TILAK MUNICIPAL MEDICAL COLLEGE & GENERAL HOSPITAL
Laxmibai Kelkar Marg, Sion, Mumbai 400 022.
Email: deanltmg@rediffmail.com & hc.edu@ltmmc.edu.in
Phone: 022-24063042/43/44 Website: www.ltmgh.com

# B.P.M.T. FEE STRUCTURE 2024-25

| A) College Fee – Students who are domicile of Maharashtra (To be paid on Document Verification) | | | | |
|---|---|---|---|---|
| (a) | (b) | (c) | (d) | (e) |
| Sr. No. | Details of Charges | Male & Female candidates belongs Open, VJ, NT-1, NT-2, NT-3, SBC, OBC & SEBC, EWS & PWD Category | Male & Female candidates belongs to SC, ST Category | Mode of Payment |
| 1) | Admission Fees | Rs.1,500/- | Rs.1,500/- | DEMAND DRAFT / PAY ORDER IN FAVOUR OF "BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION" Payable at Mumbai. (Demand Draft / Pay Order – made by "Scheduled Bank" Only) |
| 2) | Term Fees | Rs.62,500/- | ** | |
| 3) | Library Fees | Rs.1,000/- | Rs.1,000/- | |
| 4) | Locker Charges | Rs.60/- | Rs.60/- | |
| 5) | Gymkhana Fee | Rs.500/- | Rs.500/- | |
| Total (Rs.) | | Rs.65,560/- | Rs.3,060/- | |

** Reserved Category Students enlisted in column (d) above have to apply at MAHADBT for Scholarship / Freeship. (Those Students who have will not Apply to Scholarship / Freeship will have to pay Tuition Fees as per OPEN Category)

| B) University Fee – To be paid after a cut off date of Admission (All Students) | | | |
|---|---|---|---|
| Sr.No. | Details of Charges | Amount of Rs. | Mode of Payment |
| 1) | Eligibility & Enrollment Fee | Rs.3,200/- | Fees to be paid by all students irrespective of category after a cut off date of Admission. |
| 2) | Student Welfare Fund Fee | Rs.424/- | |
| 3) | University Development Fee | Rs.100/- | |
| 4) | Rashtriya Seva Yojna (Self Finance Unit) | Rs.10/- | |
| 5) | Rashtriya Seva Yojna (Entry Fee) | Rs.10/- | |
| Total (Rs.) | | Rs.3,744/- | |

| C) Deposit – To be paid after a cut off date of admission (All Students) | | | |
|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Deposit | Amount of Rs. | Mode of Payment |
| 1) | College Deposit | Rs.2,000/- | Deposit to be paid by all students irrespective of category after a cut off date of Admission. |
| 2) | Library Deposit | Rs.500/- | |
| Total (Rs.) | | Rs.2,500/- | |

Note – Students cancelling the admission on grounds of upgradation will have to pay Rs.1500/- as cancellation fees.
- Fee structure revised by competent authorities from time to time will be applicable.

| Sd/- (22.10.2024) | Sd/- (22.10.2024) | Sd/- (22.10.2024) | Sd/- (22.10.2024) |
|---|---|---|---|
| **Head Clerk (U.G.)** | **Head Clerk (PBCF)** | **Administrative Officer-1** | **Dean (Academics)** |

Sd/- (23.10.2024)
**DEAN (LTMGH)**

Scanned with CamScanner

Annexure-C

## CERTIFICATE OF MEDICAL FITNESS

This is to certify that I have conducted clinical examination of Dr. ........................................................................................................ who is desirous of admission to BSc PMT Courses.

He/she has not given any personal history of any disease incapacitating him/her to undergo the professional course. Also, on clinical examination it has been found that he/she is medically fit to undergo the BSc PMT course .

(1) Absence of any incapacitating and /or progressive systematic disease/disorder / condition,
(2) Absence of any disability of upper limb/s,
(3) Absence of any major visual/auditory disability,
(4) Absence of psychosis/neurosis/mental retardation,
(5) Ability to maintain erect posture,
(6) Reasonable manual dexterity.

| | |
|---|---|
| Address of the Registered Medical Practitioner | Signature |
| | Name |
| | Registration No. |
| Date | Seal of Registered Medical Practitioner |

**Note:**

A candidate must be medically fit to undergo the BSc PMT Course applied for. The medical fitness must be certified by a Registered Medical Practitioner in the prescribed Proforma, as given above on a **Letterhead.**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner